## MAHARASHTRA ACT No. IV OF 1982

### THE BOMBAY MOTOR VEHICLES (TAXATION OF PASSENGERS) (AMENDMENT AND VALIDATION) ACT, 1981.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १८ जानेवारी १९८२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. IV OF 1982

### AN ACT FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES (TAXATION OF PASSENGERS) ACT, 1958 AND TO VALIDATE THE LEVY AND COLLECTION OF THE TAX ON PASSENGERS CARRIED IN PRIVATE SERVICE VEHICLES.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २७ जानेवारी १९८२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४

### मुंबई मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम, १९५८ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी आणि खाजगी सेवा वाहनांतून नेण्यात येणाऱ्या उतारूंवरील कर आकारणी आणि त्याची वसुली या गोष्टी विधिग्राह्य करण्यासाठी अधिनियम.

१९५८ चा मुंबई ६७. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करणे आणि खाजगी सेवा वाहनांमधील उतारूंवर कर आकारणे व त्याची वसुली या गोष्टी विधिग्राह्य करणे आणि त्यासंबंधातील बाबींची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, मुंबई मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) (सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९८१ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

१९५८ चा मुंबई ६७. २. मुंबई मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या पूर्ण नावामध्ये "मुंबई राज्यात विवक्षित वर्गांच्या सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनातून नेण्यात येणाऱ्या" या मजकुराऐवजी, "राज्यात सार्वजनिक सेवा वाहने आणि खाजगी सेवा वाहने यांसारख्या विवक्षित वर्गांच्या मोटार वाहनातून रस्त्याने नेण्यात येणाऱ्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल. सन १९५८चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या पूर्ण नावाची सुधारणा.

सन १९५८चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या उद्देशिकेची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या उद्देशिकेत, "मुंबई राज्यात विवक्षित वर्गाच्या सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनातून नेण्यात येणाऱ्या", या मजकुराऐवजी, "राज्यात सार्वजनिक सेवा वाहने आणि खाजगी सेवा वाहने यांसारख्या विवक्षित वर्गाच्या मोटार वाहनांतून, रस्त्याने नेण्यात येणाऱ्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

सन १९५८चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या कलम २ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(अ) खंड (१) पूर्वी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल व तो नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात येईल :—

"(अ-१) खाजगी सेवा वाहनाच्या बाबतीत "प्रवास भाडे" म्हणजे, अशा वाहनांमधून कोणत्याही उतारूंना नेण्यासाठी, प्रचालकास (ऑपरेटर) दिलेली किंवा देय असलेली (मग सर्वसाधारण प्रचलित दराने असो किंवा सवलतीच्या दराने किंवा नाममात्र दराने किंवा इतर कोणत्याही दराने असो) रक्कम;";

(ब) खंड (४) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल व तो नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात येईल :—

"(४-अ) "उतारू" म्हणजे प्रवास भाडे दिल्यावर विराम वाहनातून नेण्यात येणारी [ त्या वाहनाच्या संबंधात कामावर असलेला चालक (ड्रायव्हर), वाहक किंवा परवानाधारकाचा नोकर याव्यतिरिक्त ] कोणतीही व्यक्ती; ";

(क) खंड (६) मध्ये, "किंवा कराराचे वाहन" हे शब्द वगळण्यात येतील आणि ते नेहमीकरिता वगळण्यात आल्याचे समजण्यात येईल;

(ड) खंड (६) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल आणि तो नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात येईल :—

"(६-अ) "खाजगी सेवा वाहन" म्हणजे, नऊपेक्षा जास्त उतारूंना नेण्यासाठी बनविलेली किंवा मिळतीजुळती करून घेतलेली आणि सर्वसाधारणपणे त्यांच्या धंद्यासाठी किंवा व्यवसाया-साठी किंवा त्यासंबंधात कर्मचारी किंवा इतर व्यक्ती यांना वाहून नेण्याच्या प्रयोजनासाठी, प्रचालकाकडून (ऑपरेटर) किंवा त्याच्यावतीने, प्रवास भाडे घेऊन, वापरण्यात येणारी ऑम्निबस;

(ई) खंड (७) मध्ये, "समावेश होतो" या शब्दांनंतर, "आणि त्यात, कोणत्याही खाजगी सेवा वाहनाचाही समावेश होतो" हे शब्द दाखल करण्यात येतील आणि ते नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

सन १९५८चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या कलम ३-अ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ३-अ मध्ये, स्पष्टीकरणात "ऑम्निबसमधून नेण्यात येणारे उतारू" या शब्दांनंतर, "किंवा खाजगी सेवा वाहनातून नेण्यात येणारे उतारू" हे शब्द दाखल करण्यात येतील आणि ते नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

सन १९५८चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या कलम ७ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ नंतर शेवटी पुढील परंतुकाची भर घालण्यात येईल :—

"परंतु, मुंबई मोटार वाहने (उतारूंवर कर आकारणी) (सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९८१ हा संमत होऊन अमलात आल्यामुळे, खाजगी सेवा वाहनांतून नेण्यात येणाऱ्या उतारूंवर कर आकारणे आणि त्याची वसुली या प्रयोजनासाठी, वर उल्लेख केलेला एक वर्षाचा कालावधी हा, ज्या महिन्यात उक्त अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख येत असेल त्या महिन्याच्या समाप्तीपासून मोजण्यात येईल." १९८१ चा महा-राष्ट्र ४.

खाजगी सेवा वाहनांच्या संबंधात कर आकारणे व तो वसूल करणे किंवा त्याचे प्रदान या गोष्टींचे विधिग्राह्यीकरण.

७. (१) कोणत्याही न्यायालयाचा कोणताही निर्णय, हुकूमनामा किंवा आदेश असला तरी किंवा त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, कोणत्याही वेळी, कोणत्याही खाजगी सेवा वाहनांतून नेण्यात येणाऱ्या उतारूंच्यासंबंधात, आकारण्यात व वसूल करण्यात आलेला किंवा देण्यात आलेला, किंवा आकारण्यात व वसूल करण्यात किंवा देण्यात आलेला आहे असे समजण्यात येणारा कोणताही कर हा, प्रवास भाडे दिल्यावर खाजगी सेवा वाहनांतून नेण्यात येणाऱ्या उतारूंच्यासंबंधात, मुख्य अधिनियमान्वये असा कर आकारणीयोग्य नव्हता याच केवळ कारणावरून, विधिअग्राह्य असल्याचे किंवा तो केव्हाही विधिअग्राह्य झाला असल्याचे मानण्यात येणार नाही, आणि अशा उतारूंच्यासंबंधात, आकारण्यात व वसूल करण्यात आलेला किंवा देण्यात आलेला किंवा आकारण्यात व वसूल करण्यात आला आहे किंवा देण्यात आला आहे असे समजण्यात येणारा कोणताही कर, केव्हाही कायद्यानुसार, विधिग्राह्य रीतीने आकारण्यात व वसूल करण्यात किंवा देण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. त्यानुसार राज्य शासनाने, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये, अशा उतारूंवर, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच्या कोणत्याही कालावधीसाठी कर आकारणे व तो संबंधित प्रचालकाकडून (ऑपरेटर) वसूल करणे, आणि भविष्यात, उक्त कर आकारण्याचे व तो वसूल करण्याचे चालू ठेवणे हे विधिसंमत असेल.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अशा उतारूंच्यासंबंधात वसूल करण्यात किंवा देण्यात आलेल्या कोणत्याही कराच्या किंवा त्याच्या भागाच्या परताव्यासाठी, राज्य शासन, कर अधिकारी किंवा इतर अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध, कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात, दाखल करण्यात किंवा चालू ठेवण्यात येणार नाही; आणि कोणतेही न्यायालय, अशा प्रकारे वसूल करण्यात किंवा देण्यात आलेल्या कोणत्याही कराच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश यांची बजावणी करणार नाही.

या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच्या कोणत्याही कालावधीसाठी, खाजगी सेवा वाहन प्रचालकाकडून (ऑपरेटर) येणे असलेल्या कराचे निर्धारण व त्याची वसुली.

८. (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच्या कोणत्याही कालावधीसाठी, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये, कर देण्यास पात्र असेल असा खाजगी सेवा वाहनाचा प्रत्येक प्रचालक (ऑपरेटर) अशा प्रारंभाच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच्या संपूर्ण कालावधीसाठी, कलम ३ अन्वये त्याने देय असलेली कराची एकूण रक्कम व त्याने पूर्वीच दिलेली (कोणतीही असल्यास) कराची रक्कम दर्शविणारे एक एकत्रित विवरण कर अधिकाऱ्याकडे किंवा कर अधिकाऱ्याने कलम ४ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सादर करील किंवा ते देण्याची व्यवस्था करील. जर प्रचालक (ऑपरेटर) वेगवेगळ्या कालावधींसाठी कर देण्यास पात्र असेल तर अशा कालावधींसाठी देय असलेला कर आणि अशा कालावधींसाठी पूर्वीच देण्यात आलेल्या रकमा स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, कर अधिकारी, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाची कलमे ६, ७ व ९ आणि इतर संबद्ध उपबंध हे जेथवर लागू होत असतील तेथवर, त्यानुसार, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच्या, कोणत्याही एका किंवा अधिक कालावधीसाठी खाजगी सेवा वाहनाच्या प्रत्येक प्रचालकाकडून (ऑपरेटर) येणे असलेल्या कराची रक्कम निर्धारित करण्याची कार्यवाही सुरू करील.

(३) पोट-कलम (१) अन्वये प्रचालकाने (ऑपरेटर) सादर केलेले एकत्रित विवरण, कोणतेही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, कर आकारणीची कार्यवाही पूर्ण होईल तेव्हा, कर अधिकारी, राज्य शासनाला देय असलेली रक्कम देण्यासंबंधात प्रचारकावर (ऑपरेटर) पुढीलप्रमाणे मागणी नोटीस बजावील :—

(अ) अशी रक्कम दोन लाख रुपयांपेक्षा अधिक होत नसेल त्या बाबतीत, कर अधिकारी प्रचालकाला अशी नोटीस मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत संपूर्ण रक्कम भरण्यास फर्मावील.

(ब) अशी रक्कम दोन लाख रुपयांपेक्षा अधिक होत असेल परंतु चार लाख रुपयांपेक्षा अधिक होत नसेल त्या बाबतीत, कर अधिकारी, प्रचालकाला अशी नोटीस मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत दोन लाख रुपये भरण्यास आणि उर्वरित रक्कम पुढील तीन महिन्यांत भरण्यास फर्मावील.

(क) अशी रक्कम चार लाख रुपयांपेक्षा अधिक होत असेल त्या बाबतीत, कर अधिकारी, प्रचालकास अशी नोटीस मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत दोन लाख रुपये भरण्यास आणि उर्वरित रक्कम, पुढील तीन महिन्यांत पहिला हप्ता व त्यानंतरच्या तीन महिन्यांत दुसरा हप्ता याप्रमाणे दोन समान हप्त्यांत भरण्यास त्यास फर्मावील.

(ड) उपरोक्त खंड (ब) आणि (क) यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही प्रचालकाला कर अधिकाऱ्याने त्याला दिलेल्या हप्त्यांच्या सुविधेनुसार कोणतीही रक्कम देय होण्यापूर्वी, कोणत्याही वेळी, संपूर्ण किंवा अधिक रक्कम भरता येईल.

**व्यावृत्ती.** ९. या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही कृती जर मुख्य अधिनियमान्वये अपराध नसेल परंतु या अधिनियमाच्या उपबंधांमुळे अपराध ठरत असेल तर, अशा कोणत्याही कृतिसंबंधीच्या अपराधाबद्दल ती व्यक्ती दोषी ठरणार नाही; तसेच अशा कृतीच्या किंवा वर्जनाच्यासंबंधात कोणत्याही व्यक्तीवर, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अमलात असलेल्या कायद्यान्वये जी शास्ती तिच्यावर लादता आली असती त्यापेक्षा अधिक शास्ती लादण्यात येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.